# प्रकरण ६ वे

## निष्कर्ष व सूचना

६.१ प्रस्तावना

६.२ प्रकरणांचा गोषवारा

६.३ निष्कर्ष

६.४ सूचना

६.५ समारोप

# प्रकरण ६ वे

# निष्कर्ष व सूचना

## ६.१ प्रस्तावना-

दैनिक ॲग्रोवन मधील दूधव्यवसायाचे स्थान या विषयाचा अभ्यास करण्यापूर्वी काही गृहितके मांडण्यात आली आहेत. या गृहितकांचा पाठपुरावा करतांना संपादक निशिकांत भालेराव, कोल्हापूर कार्यालयातील पत्रकार राजकुमार चौगुले यांच्याशी चर्चा केली. पूणे कार्यालयाचे मुख्य उपसंपादक सुनिल चव्हाण, गोकुळ दूध संघातील पी. ए.पाटील यांची भेट घेऊन चर्चा केली. या लघुप्रबंधासाठी वर्णनात्मक संशोधन आराखडा, संख्यात्मक व आकारात्मक विश्लेषण तंत्राचा वापर करण्यात आला आहे. याचबरोबर व्यष्टी अध्ययन हे या लघुप्रबंधाचे स्वरुप आहे.

कृषी पत्रकारितेचे महत्व ओळखून वृत्तपत्रांनी शेती विषयी मजकूर आठवड्यातून एक दिवस प्रसिध्द करण्यात सुरुवात केली. ही माहिती समाधानकारक होती मात्र शेतकऱ्यांची संपूर्ण गरज भागवली जात नव्हती. ही पोकळी भरुन काढण्यासाठी सकाळ व्यवस्थापनाने संपूर्ण 'शेती' विषयाला वाहिलेले दैनिक सुरु करण्याचा निर्णय घेतला आणि भारतातील पहिले कृषीदैनिक दैनिक ॲग्रोवन सुरु झाले. इलेक्ट्रॉनिक माध्यमापेक्षा दैनिकातील माहिती संग्रही ठेवता येते. शेती आणि दूध व्यवसायाचे घनिष्ठ नाते आहे. ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी प्राप्त करुन देणारा व्यवसाय या दृष्टिकोनातून शासन या व्यवसायाकडे पाहते. भारतात धवलक्रांती घडवणाऱ्या दूधव्यवसायाने राज्यातील अल्प भू-धारक शेतकरी आणि शेतमजूर यांनी आर्थिक स्थैर्य दिले. दूधव्यवसायातील आधुनिक तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी माध्यमांची मोठी मदत असते.

## ६.२ प्रकरणांचा गोषवारा -

निष्कर्ष मांडण्यापूर्वी मागील प्रकरणांचा आढावा घेणे महत्वाचे आहे. त्यामुळे संशोधन समजण्यास मदत होते. प्रस्तुत लघुप्रबंधाच्या पहिल्या प्रकरणात प्रस्तावना, कृषी पत्रकारितेची गरज व स्वरुप कृषी विकास व प्रसारमाध्यमे, कृषी पत्रकारितेच्या सद्य:स्थितीची चर्चा केलेली आहे.

प्रकरण दुसरे दैनिक ॲग्रोवनची कृषी पत्रकारिता या प्रकरणात सकाळ वृत्तपत्र समूहाचा आढावा, ॲग्रोवन ची माहिती, स्वरुप ॲग्रोवनचे सामाजिक उपक्रम इ. चा समावेश आहे.

प्रकरण तिसरे हे संशोधन पध्दतीचे असून प्रस्तुत लघुप्रबंधासाठी वापरण्यात येणाऱ्या संशोधनाची माहिती दिली आहे. यात नमुना निवड पध्दती वापरली आहे.

प्रकरण चौथे दैनिक ॲग्रोवनमध्ये विविध विषयांना दिलेले स्थान यात बारा महिन्यांतील अभ्यासलेल्या अंकातील विविध विषयांना किती संख्यात्मक व आकारात्मक स्थान दिले आहे हे अभ्यासलेले आहे.

प्रकरण पाचमध्ये दैनिक ॲग्रोवनमध्ये दूधव्यवसाय स्थान अभ्यासले आहे. २००७ मधील अभ्यासलेल्या प्रत्येक महिन्याच्या अंकांमध्ये दूधविषयक बातम्या ह्या किती आल्या व त्याचे आकारमानाचे विश्लेषण सारणीद्वारे केले आहे. एका अंकाचा एकूण आकारमानाचा विचार करता दूधविषयक बातम्यांची टक्केवारी काढली आहे. तसेच दूधविषयक आढावा मांडण्यात आला आहे.

**प्रस्तुत लघुप्रबंधासाठी मांडलेली गृहीतके-**

१) दैनिक ॲग्रोवनमध्ये शेतीविषयक माहिती जास्त असते.

२) दूध व्यवसायाला इतर व्यवसायापेक्षा जास्त स्थान मिळते.

३) दैनिक ॲग्रोवनमध्ये दूधव्यवसायाची सैध्दांतीक माहिती असते.

## ६.३ निष्कर्ष -

दैनिक ॲग्रोवनचे स्वरुप पाहता शेतीविषयक विस्तृत माहिती सहज उपलब्ध होत आहे. शेती तसेच शेती पूरक विविध उद्योगधंदे व व्यवसाय यांची माहिती आणि देशात व परदेशातील नविन संशोधन व प्रयोगांची माहिती मिळते आहे. शेतकऱ्यांनीच केलेले संशोधन व प्रयोग इतरांना मार्गदर्शक म्हणून ॲग्रोवन ची भूमिका महत्वाची असते.

**१)** दैनिक ॲग्रोवनच्या वर्षीाराचा अभ्यास करतांना असे दिसून येते की, पान क्र. १२ व १३ यावर सामान्यज्ञान व मनोरंजनात्मक माहिती प्रसिध्द होते. मात्र ही दोन पाने वगळता सर्व पानांवर शेतीविषयक मजकूर असतो. अभ्यासाच्या सोयीसाठी या अंकांमधील बातमीचे विविध प्रकार केले असले तरी सर्व बातम्यांचा मुख्य विषय हा शेतीवर आधारित आहे. आकारमानात्मक आणि संख्यात्मक केलेल्या वार्षिक विश्लेषणाचा तक्ता क्र.१३ वरुन दैनिक ॲग्रोवनमध्ये शेतीविषयक माहिती जास्त असते हे गृहितक खरे असते.

**(२)** महाराष्ट्रातील बहुसंख्य शेतकऱ्यांचा शेतीबरोबरच दूधव्यवसाय हा आर्थिक विकासातील अविभाज्य घटक आहे. दैनिक ॲग्रोवन हे शेतकऱ्यांसाठी असलेले पहिले कृषी दैनिक असून ही २००७ मधील अभ्यासलेल्या अंकांचा विचार करता यात एकूण (१५४४) इतक्या बातम्या प्रसिध्द झाल्या आहेत. मात्र यातील केवळ २४ बातम्या या दूधविषयक आहेत. सप्टेंबर महिन्याच्या अंकामध्ये दूधविषयक एकही बातमी देण्यात आलेली नाही. आकारमानाचा विचार करता अभ्यासलेल्या अंकांचे एकूण आकारमान ५८२, ६२४ सेमी आहे. त्यापैकी फक्त ५६८३.८४ सेमी इतक्या जागेत दूधविषयक बातम्या आहेत. टक्केवारीचा विचार करता वर्षभरात केवळ ९.८८% इतके प्रमाण दूधव्यवसायविषयक बातम्यांचे आहे. यावरुन दूधव्यवसायाला अभ्यासासाठी केलेल्या बातमी प्रकारात अधिक स्थान मिळते हे गृहीतक खोटे ठरते.

**(३)** २००७ या वर्षातील अभ्यासलेल्या दैनिक ॲग्रोवनच्या अंकामधून असे दिसते की, एकूण बातम्यांमध्ये दूधविषयक बातम्या ह्या कमी आहेत. परंतु ह्या बातम्या

(४) दूधव्यवसायाशी विविध बाजूनां स्पर्श करणाऱ्या आहेत. दूध दर कपात-दर वाढीच्या बातम्या, त्याचे

परिणाम, अनुदान, प्रशिक्षण कार्यशाळा या संबंधी माहिती आहे. व्यावसायिकांनी केलेले नवे प्रयोग, यशकथा, इतर शेतकऱ्यांना प्रोत्साहित करण्याचे काम करतात. कायदेविषयक व माहितीपर लेखांमुळे या व्यवसायाशी निगडीत शेतकऱ्यांचे ज्ञान वाढते, त्यांच्या समस्यांचे निराकरण करण्याचा प्रयत्न होतो हे तक्ता क्र. २ वरुन स्पष्ट होते म्हणजेच दैनिक ॲग्रोवनमध्ये दूध व्यवसायाशी सैध्दांतिक माहिती असते हे गृहितक खरे ठरते.

## ६.४ सूचना-

दैनिक ॲग्रोवन हे देशातील पहिले कृषीविषयक दैनिक आहे. कृषीविषयावर दैनिक निघू शकते हे ॲग्रोवन ने सिध्द केले आहे. कल्पक संपादक, उत्कृष्ट व्यवस्थापन, ॲग्रोपूर्व पाहणी, जाहिरातींचा आधार यामुळे हे वृत्तपत्र यशस्वी दिसते. यापूर्वी देखील कृषीविषयक नियतकालिके, आकाशवाणी व दूरचित्रवाणी या विषयावरील कार्यक्रमांचे प्रसारण होत आहे. मात्र दैनिक प्रकाशित करणे हे सकाळ वृत्तपत्र समूहाच्या नेटवर्क मुळे शक्य झाले आहे. शेतकऱ्यांची गरज ओळखून कृषी दैनिक सुरु करणे ही उल्लेखनिय बाब आहे.

१) दैनिक ॲग्रोवनमधून फळविषयाची परिपूर्ण माहिती दिली जाते. त्या पध्दतीने दूधव्यवसायाची अजून परिपूर्ण माहिती देण्याचा प्रयत्न करावा.

२) शेतकऱ्याला आर्थिक उत्पन्न वाढविण्यासाठी किफायतशीर दूधव्यवसाय आणि आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती देणे आवश्यक आहे.

३) दूध व्यवसाय व त्यावर आधारित उद्योगधंदे यांची माहिती शेतकऱ्यांना देणे आवश्यक आहे. यातून पर्यायी उत्पन्न वाढविण्यासाठी मार्गदर्शन करणे आवश्यक आहे.

४) दैनिक ॲग्रोवनने सामाजिक उपक्रमातून शेतकऱ्यांना यशस्वी दूधप्रकल्पांची माहिती उपलब्ध करुन पाहणी करण्याची संधी उपलब्ध करुन द्यावी.

## ६.५ समारोप-

सकाळ वृत्तपत्र समुहाने बदलत्या काळाची पावले ओळखून दैनिक ॲग्रोवन हे कृषी दैनिक सुरु केले ही कौतुकास्पद बाब आहे. त्यामुळे कृषी पत्रकारिता महत्वाची ठरली आहे. तसेच त्याची व्याप्ती वाढली आहे. शेतीचा विकास होताना त्यावर आधारित नवे

उद्योग सुरु झाले. दूधव्यवसाय हा त्यापैकी एक होय. धवलक्रांती आणि सहकार चळवळीच्या माध्यमातून आज महाराष्ट्राच्या ग्रामीण जीवनाचा तो एक घटक बनला आहे. पर्यावरणावर अवलंबून असणारी शेती करणारा शेतकरी या व्यवसायामुळे सधन होत आहे. ग्रामीण जिल्हा पातळीवरचे राजकारण, अर्थकारण या व्यवसायाभोवती फिरतांना दिसते. दूध व्यवसायासंबंधी जास्तीत जास्त माहिती मिळून शेतकरी वर्ग स्वावलंबी होणे गरजेचे आहे. कृषी दैनिक असणाऱ्या ॲग्रोवनमध्ये या व्यवसाया संबंधी बातम्या प्रकाशित होतात. त्या अनुषंगाने दैनिक ॲग्रोवनमधील दूध व्यवसायाचे स्थान या विषयावर अभ्यास करुन ठोस निष्कर्ष काढता आले. कृषी पत्रकारितेवर अभ्यास करणाऱ्या संशोधकांना यामुळे कांही दिशा निश्चित मिळू शकेल.